गुरुवार, दि. १८ डिसेंबर २०२५ ● जालना ● वर्ष ७ वे ● अंक ११४ वा ● किमंत २ रु. ● पाने ०४

8390098886 yuva.aadarsh@gmail.com 8390048886

विघ्नहर्ता हॉस्पिटल
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
MEDICAL मोरया मेडीकल अँण्ड जनरल स्टोअर्स
टेंभुर्णी ता.जाफ्राबाद जि.जालना (मेन रोड)
एक वेळ अवश्य भेट द्या
डॉ. आनंद भाले Mob. 8208427524
प्रो.प्रा. विशाल देशमुख Mob. 7770084597

https://yuvaadarsh.com

# युवा आदर्श

संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके

https://facebbook.com/yuva.aadarsh/ https://youtube.com/@Yuva_Aadarsh/ https://twitter.com/Yuva_aadarshjln/ RNI: MAHMAR/2019/78282

## जालन्यातील परिषदेत स्वच्छता, सांडपाणी प्रक्रिया व कचरा व्यवस्थापनावर विचारमंथन

# समस्यांविरुद्ध लढणाऱ्या प्रशासनाच्या तलवारीची धार बना - जी. श्रीकांत





**जालना । प्रतिनिधी -** जालना शहराच्या शाश्वत, स्वच्छ आणि नियोजित विकासासाठी बुधवार दि. १७ डिसेंबर रोजी येथील सिद्धार्थ द फर्न हॉटेलमध्ये पार पडलेल्या व्हेअर आयडियाज बिकम क्शन' या विषयावरील मंथन परिषदेत राष्ट्रीय पातळीवरील जलसंधारण, पर्यावरण क्षेत्रातील मान्यवरांनी स्वच्छता, सांडपाणी प्रक्रिया व कचरा व्यवस्थापनावर तब्बल चार तास मार्गदर्शन करून महत्त्वाच्या समस्यांच्या अनुषंगाने ठोस उपाययोजनांवर विचार मंथन केले. या निमित्ताने शहराच्या भविष्याच्या दृष्टीने बिजारोपण केले गेले असून, जालना फर्स्ट, जिल्हा प्रशासन आणि जनतेच्या सक्रिय सहभागातून निश्चितच शहर विकासाचा नवा अध्याय लिहिला जाईल, असा आशावाद निर्माण झाला आहे.

जिल्हा प्रशासन, जालना शहर महानगरपालिका आणि जालना फर्स्ट यांच्या संयुक्त पुढाकारातून 'व्हिजन जालना २०३०' या संकल्पनेवर आधारित या मंथन परिषदेत प्रारंभी महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त अर्जुन गिराम यांच्या हस्ते वृक्षपूजन करण्यात आले. पहिले सत्र सोर्स सेग्रिगेशन, कलेक्शन व सॉलिड वेस्ट मॅनेजमेंट सिस्टीम आणि दुसरे सत्र अर्बन ड्रेनेज, एसटीपी व लिक्विड वेस्ट मॅनेजमेंट या विषयावर तर दुसरे सत्र अर्बन ड्रेनेज, एसटीपी व लिक्विड वेस्ट मॅनेजमेंट या विषयावर झाले.

छत्रपती संभाजी नगर महानगरपालिकेचे आयुक्त व प्रशासकीय अधिकारी जी. श्रीकांत म्हणाले की, ज्या घरची कुटुंबप्रमुख महिला असते, त्या कुटुंबाचा विकास होतो. आज कुटुंबप्रमुख म्हणून जिल्हाधिकारी आणि जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी दोघीही महिला लाभल्या आहेत. समस्यांविरुद्ध त्या लढत असून, तुम्हा सर्वांना त्यांच्या तलवारीची धार बनावी लागेल. जोपर्यंत संपर्क, संवाद आणि समाधान एकत्र येणार नाही तोपर्यंत विकास अशक्य आहे. अधिकारी आज आहेत उद्या जातील. काम तुम्हा सर्वांनाच करावी लागणार आहे. चांगले काम करणाऱ्या अधिकाऱ्यांना बदल्यांना सामोरे जावे लागते. ठीक आहे. बदली होऊ शकते मात्र अधिकाऱ्यांची मानसिकता कोणीही बदलू शकत नाही. छत्रपती संभाजीनगरमध्ये शहर आणि नदी स्वच्छतेबाबत अवलंबविलेल्या विविध उपायांची त्यांनी माहिती देत जालना महापालिकेनेही शिवा निवृत्त स्वच्छता निरीक्षक, सेवाभावी संस्था आणि समर्पित व्यक्तिमत्त्वांची मदत घेऊन परिवर्तनासाठी प्रयत्न करावेत, असा सल्ला त्यांनी दिला.

**पुढच्या पिढीसाठी आपण कचरा सोडून जाणार का?- सौ. श्रुती लुटे**

कार्पल्स कन्सल्टिंगच्या मॅनेजिंग पार्टनर सौ. श्रुती लुटे-कुलकर्णी म्हणाल्या की, संपत्ती, पैसा, ज्ञान, कला हा ठेवा सोडून आपण इहलोकी जातो. आज जालन्यात दररोज १५० टन कचरा निर्मिती होते, या अनुषंगाने बोलताना त्यांनी आपण वेळीच सजग नागरिक बनलो नाही तर पुढच्या पिढीसाठी कचरा सोडून जाणार का, हा प्रश्न निर्माण होणार आहे, असे सांगितले. प्रक्रिया होत नसल्यामुळे घन आणि द्रवरूप कचऱ्याचे डोंगर उभे राहत आहेत. उन्हाळ्यात या ढिगारांना आग लागते तेव्हा वायु प्रदूषण निर्माण होते. ज्या ठिकाणी या हा कचरा साठवून राहतो त्या जमिनीचा कस संपुष्टात येतो. द्रवरूप कचऱ्यातील अंश जमिनीत मिसळून जलप्रदूषण होते. म्हणजेच या कचऱ्यामुळे जल, वायु प्रदूषण मोठ्या प्रमाणात होते. कचरा व्यवस्थापन आणि स्वच्छतेसाठी मंथन ची आयडिया क्शन बनावी आणि त्यासाठी जनतेने समर्पित भावनेने जालना फर्स्टला साथ द्यावी, असे आवाहन त्यांनी केले.

**जालना फर्स्टचा घनवन प्रकल्प दिशादर्शक- मित्रू**

जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी मित्रू पी.एम. म्हणाल्या की, जालना फर्स्टने जिल्हा परिषद परिसरात राबविलेला घनवन प्रकल्प दिशादर्शक असून, त्यांच्या सर्व उपक्रमांना आमचे सहकार्यालाही. जालना फर्स्ट सोबत जिल्हा परिषदेच्या माध्यमातून विविध उपक्रम राबविण्यासाठी आम्ही उत्सुक आहोत. अशा सेवाभावी संस्थांच्या माध्यमातून शहर विकासाला आकार मिळेल आणि सौंदर्यकरणात विशेष भर पडेल असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

**नदी-हवामान आणि शहर हे परस्पर संबंधाचे शास्त्रीय भान-प्रोफेसर गोसाई**

आयआयटी दिल्लीचे प्रा. ए. के. गोसाईन यांनी मंथन परिषदेत ऑनलाईन सहभाग नोंदविला. ते म्हणाले की, नदी, हवामान आणि शहर यांचे नाते परस्परावलंबी आहे. हवामान बदलाचा थेट परिणाम नदीच्या प्रवाहावर होत असून, त्याचा परिणाम शहरांच्या पाणीपुरवठा, पूर व्यवस्थापन आणि पर्यावरणावर दिसून येतो. अनियोजित शहरीकरणामुळे नद्यांचे नैसर्गिक प्रवाह अडथळले जातात, ज्यामुळे हवामानातील टोकाच्या घटना अधिक तीव्र होतात. त्यामुळे शाश्वत शहरी विकासासाठी नदी व्यवस्थापन आणि हवामान समज यांचा समन्वय अत्यावश्यक आहे.

**पर्यावरण संरक्षणासाठी सल्लागाराची नियुक्ती करणे गरजेचे- डॉ. यू. के. शर्मा**

मंत्राज ग्रीन रिसोर्सेस लिमिटेडचे चीफ प्रमोटर व चेअरमन डॉ. यू. के. शर्मा म्हणाले की, जसे आपण पैशाच्या नियोजनासाठी सीए, आरोग्याच्या संरक्षणासाठी डॉक्टरांवर अवलंबून असतो त्याचप्रमाणे महापालिकेने पर्यावरण संरक्षणासाठी सल्लागाराची नियुक्ती करणे गरजेचे आहे. आपण आतापर्यंत ६८ देशांमध्ये जाऊन आलेलो आहे. कचऱ्यांपासून सीएनजी, हायड्रोजन, नायट्रोजन प्रकल्प उभारणी शक्य आहे. अनेक ठिकाणी झालेली आहे. भविष्यात इंधन म्हणून विशिष्ट प्रक्रियेद्वारे कचऱ्याचा वापर शक्य आहे. हायड्रोजन बनविताना त्यातील अमोनिया काढून उर्वरित कचऱ्याचा वापर शेतकऱ्यांना खत म्हणूनही करता येणार आहे. हिरोशिमा शहरावर अणुबॉम्ब टाकल्यामुळे जे परिणाम जाणवले तेच परिणाम दररोज निर्माण होणाऱ्या कचऱ्यामुळे जगाला सहन करावे लागत आहे.

**जालना युवा फर्स्टचा पुढाकार अत्यंत कौतुकास्पद-गौरी मिरासे**

इको सत्वच्या को-फाउंडर गौरी मिरासे म्हणाल्या की, तर्कबद्ध पद्धतीने हंगामी वाहणाऱ्या नद्यांची स्वच्छता करणे सहज शक्य आहे. नद्यांमध्ये वाहून येणारा कपड्यांचा, प्लास्टिकचा कचरा वेळच्या वेळी त्याच ठिकाणी वेगवेगळ्या केल्यास अथवा अडविल्यास अनेक समस्या सुटू शकतात. आजकालची युवा मंडळीने पाणी आणि नद्या या समस्यांपासून जवळपास ब्रेकपच घेतला आहे. या समस्यांचा आपल्यावर जसे काही परिणामच होत नाही असे त्यांना वाटू लागले आहे, अशी खंत व्यक्त करतानाच, जालन्यात मात्र जालना फर्स्टच्या युवा मंडळीने याच विषयावर जनजागृती आणि समस्या निवारणासाठी घेतलेला पुढाकार अत्यंत कौतुकास्पद आहे. सांडपाण्यावर प्रक्रिया करून हे पाणी औद्योगिक कारखाने आणि विविध प्रकल्पासाठी कसे वापरले जाऊ शकते यावर त्यांनी सखोल मार्गदर्शन केले.

**आगामी २० वर्षे समोर ठेवून कोणताही प्रकल्प डिझाईन केला जावा-अमोल गजरे**

एन्व्हर्सिस ग्रीनटेक सोल्युशन्सचे डायरेक्टर अमोल गजरे यांनी सांडपाणी व्यवस्थापन व पुनर्वापर यावर प्रभावी मार्गदर्शन करताना सांगितले की, भारतात ३७% सांडपाण्याचा पुनर्वापर केला जातो. आता महाराष्ट्रात हे प्रमाण ७० टक्केवर पोहोचले आहे ही अत्यंत उल्लेखनीय बाब आहे. सांडपाण्यावर वेळीच प्रक्रिया केली तर पाण्यापासून होणारे विविध आजार आपण रोखू शकतो. पाण्याच्या पुनर्वापरातून पाण्याची बचत तर होईलच शिवाय जल पातळी वाढविण्यासह जलप्रदूषण रोखण्यासाठी मोठा हातभार लागणार आहे. जालन्यात सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प होतो आहे. आगामी २० वर्षे समोर ठेवून कोणताही प्रकल्प डिझाईन केला जावा. त्यासाठी सातत्य राखणे, त्यासाठी कुशल टीम, मेंटनन्स आणि चांगली प्रयोगशाळा असायला हवी. ही परिपूर्ण व्यवस्था असल्यास सांडपाणी प्रकल्पातून कृषी, औद्योगिक, सिविल कन्स्ट्रक्शन या प्रकल्पासाठी आपण पाणी पुरवू शकतो, असे त्या म्हणाल्या.

**पाणी आणि नद्याचे आरोग्य जुळले पाहिजे-डॉ. सुमंत पांडे**

वॉटर लिटरसी सेंटरचे (यशदा, पुणे) एक्झिक्युटिव्ह डायरेक्टर डॉ. सुमंत पांडे यांनी भविष्याच्या दृष्टीने जालना फर्स्ट हवा असेल चांगले प्रशासन, कर्तव्यदक्ष अधिकारी आणि समर्पित जनसभागावर भाष्य केले. कुंडलिका सीना नदी पुनरुज्जीवनसाठी काम करणाऱ्या सेवाभावी संस्थांचा त्यांनी विशेष उल्लेख केला. या कार्यामुळे यंदा नदीने पात्र सोडले नाही, असे सांगून पाणी आणि नद्याचे आरोग्य जुळले पाहिजे, असे ते म्हणाले. दूषित पाण्यामुळे गंभीर आजार आणि नको नपुसंकता बळावते असे सांगून, एकीकडे नदीत घाण पाणी सोडायचे आणि दुसरीकडे डायलेसिसद्वारे रक्त शुद्धीवर पैसा खर्च करायचा, हे कितपत योग्य आहे असे ते म्हणाले. सांडपाणी प्रक्रिया प्रकल्प मध्ये सर्व काही चांगले नाही त्यासाठी प्लॅन करावा लागेल. त्यासाठी जालना फर्स्ट ला आमची नदियों की पाठशाला टीम सर्वतोपरी सहकार्य करेल, असे त्यांनी आश्वासित केले.

प्रास्ताविक पर भाषणात जालना फर्स्टचे अध्यक्ष गोविंद गोयल म्हणाले की, प्रगती आणि विकासात सर्वांचे योगदान महत्त्वाचे आहे. त्याच उद्देशाने जिल्हा प्रशासन, सेवाभावी संस्था, उद्योजक यांना एका प्लॅटफॉर्मर आणणे हा जालना फर्स्ट स्थापनेचा उद्देश आहे. सर्व क्षेत्रांच्या विकासासाठी सर्व घटकांना एकत्र आणण्यात आले आहे. तंत्रज्ञानाचा वापर करून कचरा व्यवस्थापन, सांडपाणी व्यवस्थापन करणे गरजेचे आहे. ही जबाबदारी फक्त प्रशासनाची नसून आपणा सर्वांची आहे हाच संदेश आम्ही जालना फस्टच्या माध्यमातून देऊ इच्छितो. स्थापनेनंतर एक ते १५ ऑगस्ट दरम्यान तीस सेवाभावी संस्थांना सोबत घेऊन स्वच्छता अभियान राबविण्यात आले. बदलासाठी जलसाहभाग आवश्यक असल्याचे सांगून त्यांनी मंथन परिषदेची संकल्पना विशद केली. याप्रसंगी अर्बन प्लॅनर तथा डिझाईनशाला कोलॅबोरेटिव्हचे फाउंडर व प्रिन्सिपल आर्किटेक्ट आशिक जैन, राजेंद्र जावळे यांनीही मार्गदर्शन केले.

प्रारंभी घनश्याम गोयल, संजय अग्रवाल, काजल पटेल, डी. बी. सोनी, डॉ. सौ. अनिता तवरावाला, डॉ. अनुराधा राख, यश भक्कड आदींनी मान्यवरांचे स्वागत केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन धवल मिश्रीकोटकर यांनी केले तर शेवटी उपस्थितांचे आभार विनीत पित्ती आणि रितेश मिश्रा यांनी मानले.

### जालना फर्स्टच्या उपक्रमांना सर्वतोपरी सहकार्य - मित्तल

जिल्हाधिकारी अशीमा मित्तल म्हणाल्या की, मंथन परिषदेची जालना फर्स्टची संकल्पना अतिशय चांगली असून, त्यांच्या उपक्रमांना जिल्हा प्रशासनाचे सदैव सहकार्य राहील. जालना शहरातील सेवाभावी संस्था चांगल्या पद्धतीने शहर विकासाला हातभार लावत असल्याचा आपणास सार्थ अभिमान आहे, असे सांगून आगामी निवडणुकांमध्ये लोकशाहीच्या बळकटीसाठी जनतेने मतदानाचा टक्का वाढवावा, असे आवाहन केले.

# युवकांच्या आरोग्याशी खेळणाऱ्यां लालासाठी सदर बाजार पोलीसांची 'आरोग्य' खेळी

## सदर बाजार पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक म्हणताहेत दिवसभर काम; रात्री बारा वाजता सोडा

दीपक शेळके

जालना - शहरात अवैधरित्या गुटखा विक्री करत युवकांच्या आरोग्याशी खेळणाऱ्या सतीश जैस्वाल उर्फ लाला याच्या गुटख्याच्या गाड्यावर कारवाई करण्यासाठी सदर बाजार पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक आरोग्यांचे कारण देत आर्थिक हितसंबंधांची आरोग्य खेळी खेळत असल्याचे स्पष्ट होत आहे.

मंगळवार (दि १६) रोजी रात्री ११.५० मि. सदर बाजार पोलीस ठाण्याचे पोलिस निरीक्षक यांना सतीश जैस्वाल उर्फ लाला यांच्या सदर बाजार पोलीस ठाण्याच्या हद्दीतील भोकरदन नाका परिसरातील त्यांच्या देशी दारु विक्री केंद्राजवळ गुटख्याच्या तीन गाड्या असल्याची अधिकृत माहिती देण्यात आल्यानंतर त्यावर कारवाई करण्यासाठी रात्रीच्या पथकाला सांगण्यात येईल असे म्हणत सदर बाजार पोलीस ठाण्याच्या पोलीस निरीक्षकांनी झोपेला प्राधान्य दिले. संबंधीत व्यक्तीने सदर बाजार पोलीस ठाण्याच्या पोलीस निरीक्षकांना रात्री फोन करून अवैध गुटख्याची माहिती दिल्या नंतर त्यावर कारवाई होणे अपेक्षित असतांना कारवाई झाली नाही. त्यासंदर्भात दुसऱ्या दिवशी म्हणजेच बुधवार (दि १७) रोजी सायंकाळी ७ वाजेच्या सुमारास पोलीस निरीक्षकांची या संदर्भात भेट घेतली असता त्यांनी त्यांच्याच आरोग्याचे कारण देत युवकांच्या आरोग्याशी खेळणाऱ्या लालासाठी खुली सुट दिल्याचे दिसून येत आहे. यासंदर्भात पोलीस निरिक्षक संदीप भारती यांची भेट घेतल्यानंतर त्यांनी स्पष्ट केले की, दिवसा कारवाई साठी सांगा, मला माझे आरोग्य पाहणे आहे. रात्रीला झोप घेणे महत्वाचे आहे. म्हणजे रात्रीच्यावेळी अवैध धंदे यांना सदर बाजार पोलीस ठाणे हद्दीत खुली सुट आहे असेच त्यांना म्हणायचे असेल ना?

पोलीस अधिक्षक अजयकुमार बन्सल यांनी कालच अंमली पदार्थ व त्यासंबधींने रील स्पर्धा ठेवली होती. या स्पर्धेत एका तिकडीने ड्रग्ज सेवन करत त्याला प्रोत्साहन दिले. आणि त्याच तिकडीला पोलीस अधिक्षकांनी बेस्ट रिल्स घोषित केले. मुळात अंमली पदार्थापासून दूर ठेवणारी अथवा त्याला विरोध करणारी रील्सला पारितोषित मिळणावयास हवे असतांना ज्या तिकडीने अंमली पदार्थ सेवन केले. ती रिल्स योग्यरित्या पाहिल्यास त्यातून कोणताही योग्य संदेश म्हणजेच अंमली पदार्थाचे सेवन न करणे यासारखा मॅसेज मिळत नाही. असे असतांना ती रिल्स या स्पर्धेत टिकते कशी? आणि पारितोषिक घेते कशी? असा प्रश्न उपस्थित होतो आहे.

केवळ प्रसिद्धीच्या माध्यमातून युवकांना प्रेरित करण्याचा केविलवाणा प्रयत्न करायचा आणि दुसरीकडे सतीश उर्फ लाला यासारख्या गुटखा माफीयाला अभय द्यायचा हा दुटप्पी पणा पोलीस अधीक्षकांनी घ्यावा यापेक्षा दुसरे ढोंगी होणे नाही.

मुळात विषय आहे. मंगळवार (दि. १६) रात्री ११.५० नंतरचा यावेळी सतिश जैस्वाल उर्फ लाला यांच्या देशी दारुच्या दुकानाजवळ गुटख्याने भरलेल्या तीन गाड्या बेदिक्कत उभ्या होत्या. यासंदर्भात संतोष भुतेकर, दीपक शेळके यांनी आयुष नोपाणी, संदीप भारती, पंकज जाधव, धनाजी कावळे, कदम यासह विविध पोलीस अधिकारी कर्मचारी यांना फोनाफानी केली. यातील बहुतांशी फोन रिसिव्ह झाले. काहींनी फोन रिसिव्ह केले नाहीत. फोनवर या अधिकाऱ्यांना सतीश उर्फ लाला यांच्या अवैध गुटख्याच्या जवळपास ५० ते ६० लाख्यांच्या गुटख्यासह तीन गाड्या उभ्या असल्याची माहिती दिली. मात्र, असे असतांना एकाही अधिकाऱ्यांने तत्परता दाखवत कारवाई करण्याचे धाडस दाखविले नाही. आता हे धाडस न दाखविण्यामागे नेमके कारण काय असावे हे न समजण्यासारखे मुळीच नाही. एकीकडे पोलीस अधिक्षक रील्स स्पर्धेततून जनजागृती करण्यासाठी प्रयत्नशील असतांना त्यांचेच अधिकारी गुटखा माफियांवर माहिती मिळाल्यानंतरही कारवाई करत नाहीत. या प्रकाराकडे पोलीस अधिक्षकांनी जातीने लक्ष घालण्याची आवश्यकता निर्माण झाली असून सतिश जैस्वाल उर्फ लाला यासारख्या गुटखा माफीयावर अंकुश लावल्याशिवाय पोलीस अधिक्षकांच्या कोणत्याही जनजागृतीचे फलीत होणार नाही हे मात्र तितकेच खरे आहे.

## भाजपच्या इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती शुक्रवार ऐवजी शनिवारी

**जालना । प्रतिनिधी-** जालना महानगरपालिका सार्वत्रिक निवडणूक २०२५-२६ करिता भारतीय जनता पार्टी जिल्हा जालना महानगर च्या वतीने इच्छुक उमेदवारांच्या मुलाखती काही कारणास्तव एक दिवस पुढे ढकलण्यात आल्या असून त्या मुलाखती दि. १९ डिसेंबर २०२५ ऐवजी दि. २० डिसेंबर २०२५ रोजी शनिवार रोजी सकाळी १०.०० वा भारतीय जनता पार्टी कार्यालय, संभाजीनगर, जालना येथे घेण्यात येणार आहे. यावेळी माजी केंद्रीय राज्यमंत्री मा.रावसाहेब दानवे, भाजपा जालना महानगरपालिका निवडणूक प्रभारी खा.डॉ.भागवत कराड, माजी मंत्री आ.बबनराव लोणीकर, जालना ग्रा. जिल्हाध्यक्ष आ.नारायणभाऊ कुचे, आ.संतोष पाटील दानवे, जालना महानगरपालिका निवडणूक प्रमुख माजी आ.कैलासजी गोरंटयाल, जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे, माजी शहराध्यक्ष राजेश राऊत, अशोक आण्णा पांगारकर, सतीश जाधव, विजय कामड, विमलताई आगलावे या मान्यवरांची प्रमुख उपस्थिती राहणार आहे. त्याचबरोबर मुलाखतीस येणाऱ्या व राखीव जागेवर निवडणूक लढविणाऱ्या इच्छुक उमेदवारांनी मुलाखतीस येताना आपण ज्या राखीव प्रवर्गातून निवडणूक लढवू इच्छितो ते जातीचे प्रमाणपत्र व जात पडताळणी प्रमाणपत्र, आधार कार्ड, मतदान कार्ड व आपल्याकडे असलेल्या सर्व मूळ कागदपत्रासह मुलाखतीस उपस्थित राहावे, असे आवाहन भाजपा जालना महानगर जिल्ह्याच्या वतीने करण्यात येत आहे.

संपादकीय पान

## रस्ते अपघातातील बळींची संख्या चिंताजनक

उत्तर प्रदेशातील मथुरा एक्सप्रेस वे वर मंगळवारी मृत्यूचे तांडव पाहायला मिळाले. दाट धुक्यामुळे पहाटे साडे चारच्या सुमारास आठ बस आणि तीन मोटारी एकमेकांवर आदळल्या. त्यानंतर वाहनांनी पेट घेतला यामध्ये २५ जणांचा होरपळून मृत्यू झाला तर ५९ जण गंभीर जखमी झाले. या अपघाताने देशभर हळहळ व्यक्त होत आहे. अर्थात असा भीषण अपघात घडल्याची ही पहिली वेळ नाही याआधी असे अनेक अपघात देशात घडले असून त्यात लाखो लोकांचा जीव गेला आहे. गेल्या दहा वर्षात देशभरात झालेल्या अपघातात १५ लाख ३० हजारांहून अधिक अधिक नागरिकांचा मृत्यू झाला आहे. केंद्रीय रस्ते मंत्रालयाने ही आकडेवारी जाहीर केली आहे. केंद्रीय रस्ते मंत्रालयाच्या संकेत स्थळावर ही आकडेवारी उपलब्ध असून त्यानुसार सण २०१३ ते २०२३ या दहा वर्षात रस्ते अपघातात बळी पडलेल्यांच्या संख्येत महाराष्ट्र तिसऱ्या क्रमांकावर आहे. पहिल्या स्थानावर उत्तर प्रदेश तर दुसऱ्या स्थानावर तामिळनाडू ही राज्ये आहेत. महाराष्ट्रासारख्या प्रगतशील राज्यासाठी ही आकडेवारी भूषणावह नाही. रस्ते अपघातात जर इतके लोक दरवर्षी मरण पावत असतील तर ती चिंतेची बाब आहे. विशेष म्हणजे यातील बहुतांशी मृत्यू हे २० ते ५० या वयोगटातील आहे. याचाच अर्थ रस्ते अपघातात सर्वाधिक मृत्यू हे तरुणांचे होत आहेत. ज्या तरुणांकडे देश भावी आधारस्तंभ म्हणून पाहत असतो तेच तरुण जर असे अकाली मृत्यू पावत असेल तर ती देशाची मोठी हानी आहे. केवळ सर्वसामान्य तरुणच नाही तर देशातील अनेक महनीय व्यक्तींचा मृत्यू देखील रस्ते अपघातात झाला आहे. दोन वर्षापूर्वी शिवसंग्राम पक्षाचे संस्थापक अध्यक्ष आणि मराठा समाजाचे नेते विनायक मेटे यांचे अपघाती निधन झाले. त्यांच्या निधनाने मराठा समाजाचीच नव्हे तर राज्याची मोठी हानी झाली. त्यांच्या अपघाती निधनातून राज्य सावरत नाही तोच टाटा उद्योग समूहाचे माजी अध्यक्ष व प्रसिद्ध उद्योगपती सायरस मिस्त्री यांचे अपघाती निधन झाले. सायरस मिस्त्री यांचा गुजरातच्या अहमदाबादवरून मुंबईला जाणाऱ्या मार्गावर चारोटी जवळ सुर्या नदीच्या पुलावर अपघात झाला. सायरस मिस्त्री यांचे देशाच्या औद्योगिक विकासात महत्वाचे योगदान आहे. त्यांच्या निधनाने उद्योग विश्वात मोठी शोककळा पसरली होती. सायरस मिस्त्री, विनायक मेटे यांच्यासारख्या समाजातील महनीय व्यक्तींच्या अशा अकाली निधनाने समाजाचे मोठे नुकसान होत आहे. विनायक मेटे, सायरस मिस्त्री हे समाजातील महनीय व्यक्ती आहेत म्हणून त्यांच्या निधनाची बातमी झाली. रस्ते अपघातात दरवर्षी लाखो लोकांचा मृत्यू होतो देशात सर्वात जास्त मृत्यू रस्ते अपघातात होतात. अपघातात जखमी आणि कायमचे जायबंदी होणाऱ्यांची संख्या तर अगणित आहे. विशेष म्हणजे यात तरुणांचा समावेश अधिक आहे. ज्या तरुणांच्या जोरावर आपण महासत्ता होण्याचे स्वप्न पाहत आहोत त्याच तरुणांचे अपघातात निधन होत असेल तर ती देशाची मोठी हानी आहे. अनेक प्रयत्न करूनही देशातील रस्ते अपघातांची संख्या का कमी होत नाही हा संशोधनाचा विषय आहे. वाढत्या रस्ते अपघातांना जितकी व्यवस्था जबाबदार आहेत तितकीच मानवी चुकाही जबाबदार आहेत. टोलच्या माध्यमातून कोट्यवधी रुपयांची वसुली केली जात असतानाच महामार्गावर जीवघेण्या ब्लॅकस्पॉट मध्ये सुधारणा होत नाही. त्याचप्रमाणे रस्त्यांवरील खड्डे, धुळीचे साम्राज्य, महामार्गावरील अतिक्रमणे, सर्व्हिस रोडचा अभाव, रस्त्यावरच उभी केली जाणारी अवजड वाहने, बंद पडलेल्या वाहनांसाठी कमी पडत असलेली मदत केंद्रे, मोकाट जनावरे, अपुरे दुभाजक याबाबी अपघातांसाठी कारणीभूत ठरत आहेत. महामार्गावर वाहन चालकांकडून वेग मर्यादा पाळण्यात येत नाही. बहुतेक प्रवासी १०० किमी पेक्षा अधिक वेगाने वाहने चालवतात. ट्रक व इतर मोठ्या वाहनांकडून लेनची शिस्त पाळली जात नाही. काही वाहन चालक तर दारु पिऊन वाहने चालवतात तर काही वाहन चालक वाहन चालवत असताना मोबाईलवर बोलतात. वाहनांची व्यवस्थित निगा न राखणे, सीट बेल्ट न लावणे या गोष्टीही अपघातास कारणीभूत ठरतात. नियम माहीत असूनही चालक त्यांचे पालन करत नाहीत. सगळ्यांनाच कमी वेळात आपले ठिकाण गाठायचे असते. नियमांचे पालन न केल्यानेच अपघातांची संख्या कमी होत नाही. अपघातांची संख्या कमी करायची असेल तर वाहन चालकांना नियमांचे पालन करावेच लागेल. नियम पाळा अपघात टाळा!

**श्याम ठाणेदार, दौंड जिल्हा पुणे ९९२२५४६२९५**

## ८०० संघटनांचा सनातन संस्कृती रक्षणाचा निर्धार !

# ‘सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सवा’च्या समारोपातून शौर्याची प्रेरणा !

**नवी दिल्ली । प्रतिनिधी -** देशाच्या राजधानीतील भारत मंडपम् येथे पार पडलेल्या दोन दिवसीय ‘सनातन राष्ट्र शंखनाद महोत्सवा’ला देशभरातून ३ हजारांहून अधिक हिंदू, तसेच ८०० हून अधिक संघटनांचे पदाधिकारी उपस्थित होते. या वेळी समस्त संत-महंत, मान्यवर, मंत्री, उद्योजक, अधिवक्ता, विचारवंत, संरक्षणतज्ञ आदींनी सनातन राष्ट्र स्थापन्यासाठी संस्कृती रक्षणाचा निर्धार व्यक्त केला, तर ‘सुरक्षा, संस्कृति आणि शौर्य’ या विषयांवरील उद्बोधन, तसेच शस्त्रप्रदर्शन यांमुळे सर्वांमध्ये शौर्याची प्रेरणा निर्माण झाली.

**तर आपला भारत ‘हिंदु राष्ट्र’ नव्हे, तर ‘प्रजासत्ताक हिंदु राष्ट्र’ बनेल ! - स्वामी विज्ञानानंदजी**

या महोत्सवाच्या समापनाच्या वेळी झालेल्या सनातन राष्ट्र संकल्प संतसभेत ‘हिंदूंचे सांस्कृतिक घोषणापत्र’ या विषयावर बोलतांना विश्व हिंदु परिषदेचे सह महामंत्री स्वामी विज्ञानानंदजी म्हणाले की, जे राष्ट्र हिंदु जीवनपद्धत स्वीकारील, ते हिंदु राष्ट्र बनेल. स्वातंत्र्यपूर्व भारत समृद्ध होता. सूर्याच्या उदयापासून ते अस्तापर्यंतचा सर्व भूप्रदेश हिंदूंच्या अधिपत्याखाली होता. गतकाळात हा सर्व प्रदेश आपण गमावला आहे. आज हिंदूंची केवळ भारतातीलच काही राज्यांमध्ये सत्ता आहे. त्यामुळे त्यांनी केवळ दांडिया, होळी किंवा दिवाळी यांसारख्या सणांमध्ये रमून न जाता उर्वरित प्रदेश जिंकण्यासाठी प्रयत्न केले पाहिजेत. त्यामुळे आपला देश केवळ हिंदु राष्ट्रच नाही, तर ‘प्रजासत्ताक हिंदु राष्ट्र’ बनेल.

**केंद्र सरकारने चारित्र्य निर्माण करणारे शैक्षणिक धोरण आखावे ! - पू. पवन सिन्हा गुरुजी**




चारित्र्यवान लोकच धर्मयुद्ध करू शकतात. ज्यांच्याकडे चारित्र्य नाही, ते युद्ध जिंकू शकत नाही. भारताकडे चरित्र्य असल्यामुळे पाकिस्तानच्या विरोधातील अनेक लहान-मोठ्या युद्धांत भारताला यश मिळाले. चारित्र्य निर्माण करणे सोपे नाही आणि चारित्र्याचा शिक्षणाशी काहीही संबंध नाही. अनेक उच्च विद्याविभूषित लोक भ्रष्टाचारी आहेत. सध्याचे शिक्षण युवकांमध्ये चारित्र्य निर्माण करू शकत नाही, त्यामुळे केंद्र सरकारने चारित्र्य निर्माण करणारे शैक्षणिक धोरण आखावे, असे आवाहन ‘पावन चिंतनधारा आश्रमा’चे संस्थापक पू. पवन सिन्हा गुरुजी यांनी केले.

…संविधानामध्ये हा भेदभाव का ? : या वेळी हिंदु जनजागृती समितीचे राष्ट्रीय प्रवक्ते श्री. रमेश शिंदे म्हणाले की, आज भारतीय राज्यघटनेच्या प्रस्तावनेत ‘हा देश सेक्युलर आहे’, असा उल्लेख आहे; मात्र राज्यघटनेच्या २५ व्या कलमापासून पंथाच्या आधारावर भेदभाव करण्यात आला आहे. म्हणजे अल्पसंख्यांकांसाठी वेगळे नियम, वेगळे प्रावधान (तरतुदी) आदी करण्यात आले आहे. सेक्युलर देशात असा भेदभाव काय कामाचा ? शंखनाद महोत्सवासाठी उपस्थितांनी येथून पुढे आपापल्या क्षेत्रात सनातन राष्ट्राच्या स्थापनेचे कार्य करण्याचा सुसंकल्प केला पाहिजे, असे आवाहन छत्तीसगड येथील ‘शदाणी दरबारा’चे पीठाधीश्वर प.पू. युधिष्ठिरलाल महाराज यांनी केले. तर हिंदु जनजागृती समितीचे धर्मप्रचारक सद्गुरु नीलेश सिंगबाळ म्हणाले की, ‘न मे भक्तः प्रणश्यति ।’, म्हणजे ‘माझ्या भक्ताचा नाश होणार नाही’, असे भगवंताचे वचन आहे. त्यामुळे आपत्काळापासून रक्षण होण्यासाठी विविध सुरक्षात्मक उपायांसह ईश्वराचे भक्त बनणे आवश्यक आहे. या महोत्सवाची सांगता ‘वन्दे मातरम्’ने झाली. या महोत्सवासाठी भारत शासनाच्या कला, संस्कृती विभाग आणि भाषा विभाग, सांस्कृतिक मंत्रालय, तसेच दिल्ली राज्य पर्यटन विभाग यांनी सहकार्य केले.

# विद्यार्थी जीवनाचे सोने करणारे शिक्षक!

मी माझ्या गावातील जि.प.प्रशाला खंडाळी या शाळेत माध्यमिक पर्यंत शिक्षण पूर्ण केले. दहावीपर्यंत शिक्षण घेत असताना मला अनेक चांगल्या व वाईट शिक्षकांचा अनुभव येत गेला. चांगल्या शिक्षकांना मी माझ्या हृदयात कायमचे स्थान देऊन टाकले आहे. आणि वाईट शिक्षक म्हणजेच व्यसनी, कामचुकार, बेशिस्त, टंगळमंगळ करणारे, शाळेत वेळेवर न येणारे, काहीतरी बोलबच्चन करून टाईमपास करणारे आणि विद्यार्थ्यांना स्वतःच्या बढाया सांगणारे, शिक्षक सुद्धा मला भेटले. परंतु अशा भ्रष्ट व शिक्षण क्षेत्राला कलंकित करणाऱ्या शिक्षकांना मी माझ्या मनातून कायमचे बाद करून टाकले आहे. आणि चांगले शिक्षक आजही मी माझ्या हृदयाच्या कप्प्यात सुरक्षित जपून ठेवले आहेत. कारण हे शिक्षक मला नेहमी प्रेरणा देण्याचे काम करतात. यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून मी त्यांच्या पावलावर पाऊल टाकण्याचे काम करतो. अशा गुणी, ज्ञानी व चारित्र्यसंपन्न शिक्षकांमुळेच सध्या शाळा व कॉलेज शाबूत आहेत. नाहीतर कधीच शाळा व कॉलेज व्यसनाचे अड्डे झाले असते. वस्तुस्थिती अशी की, हल्ली आपण प्रत्येक शाळेतील वर्ग खोलीत जाऊन बघितले असता, आपल्याला असे दिसून येईल की, विद्यार्थ्यांनी व शिक्षकांनी सुपार्या खाऊन वर्ग खोल्या रंगवून टाकल्या आहेत. अशा व्यसनी व भ्रष्ट शिक्षकांकडून विद्यार्थ्यांनी कोणती प्रेरणा घ्यावी? बरेच शिक्षक विद्यार्थ्याला तंबाखू व गुटखा मागून खातात आणि विद्यार्थी सुद्धा शिक्षकांना न घाबरता गुटखा व तंबाखू मागून खातात. म्हणजे शिक्षक, विद्यार्थी हे गुरु, शिष्य असतात. शिक्षकाने विद्यार्थ्याला कोणते ज्ञान द्यायला हवे आणि विद्यार्थ्यांनी कोणते ज्ञान आत्मसात करायला हवे? याचा सारासार विचार प्रत्येक शिक्षकाने केला पाहिजे. सध्या प्रत्येक शाळेत व्यसन व टाईमपास करणाऱ्या शिक्षकांची संख्या अधिक आहे. काही काही शिक्षक तर शाळेत येताना फुल दारू पिऊन येतात. आणि विद्यार्थ्यांना शिकवायचे सोडून भलतेच काहीतरी सांगतात. अशा व्यसनी, कामचुकार व भ्रष्ट शिक्षकांमुळे शिक्षण क्षेत्राचे नाव खराब होत आहे. विद्यार्थ्यांचे भवितव्य धोक्यात येत आहे. याचा परिणाम थेट देशाच्या विकासावर होत आहे. परंतु अशा भ्रष्ट, व्यसनी कामचुकार व बेशिस्त शिक्षकांच्या दुनियेत मी काही निर्व्यसनी, शिस्तप्रिय, कर्तृत्ववान आणि आदर्श शिक्षक पाहिले आहेत. त्यांच्या कार्याने मी अचंबित होऊन थक्क झालो आहे. त्यांचे कार्य खूप मोठे व विशाल सागरा एवढे आहे. त्यांच्या कार्याची पावती खूप मोठे आहे. अशा कर्तृत्ववान व आदर्श शिक्षकांपैकी एक शिक्षक म्हणजे बबन दामोदर गुळवे सर हे आहेत. गुळवे सर विद्यार्थ्यांना जीव ओतून व जादा तासिका घेऊन मन लावून शिकवण्याचे काम करतात. ते गणित विषयाचे तज्ज्ञ शिक्षक असल्यामुळे ते विद्यार्थ्यांना विविध नमुन्याची उदाहरणे सोडवून दाखवतात आणि तशी उदाहरणे त्यांच्याकडून सोडवून घेतात. महामानवांच्या जयंती निमित्त व पुण्यतिथीनिमित्त त्यांच्या जीवनकार्याचा थोडक्यात आढावा घेतात. प्रार्थनेच्या वेळी विद्यार्थ्यांना छान छान बोधकथा सांगतात. एखाद्या वर्गावर शिक्षक गैरहजर असेल तर गुळवे सर तो तास घेऊन शिकवतात. गुळवे सरांचे बरेच विद्यार्थी मोठ्या पदावर कार्यरत आहेत. त्यांनी विद्यार्थ्यांच्या जीवनाचे सोने करून शिक्षकी पेशाला न्याय दिला आहे.

तसेच लातूर येथील सुप्रसिद्ध लेखक तथा कवी भारत सातपुते सर हे सुद्धा एक विद्यार्थ्यांचे हित करू पाहणारे गुणी व ज्ञानी शिक्षक होते. आता ते सेवानिवृत्त झाले आहेत. भारत सातपुते सर विद्यार्थ्यांना खूप तळमळीने व जीव ओतून शिकवायचे. आपले विद्यार्थी घडावेत, भविष्यात कोणत्यातरी पदावर विराजमान व्हावेत आणि आई वडिलांचे नाव साकार करावे, म्हणून ते विद्यार्थ्यांसाठी सुट्टीच्या दिवशी सुद्धा वर्ग भरवून विद्यार्थ्यांना शिकवायचे. गोरगरीब, अनाथ व ज्या मुलांना आई-वडील नाहीत, अशा मुलांच्या शिक्षणाचा पुर्ण खर्च ते सारायचे. त्यांना व्यसनी, कामचुकार व बेशिस्त शिक्षकांचा खूप तिटकारा आहे. सातपुते सरांचे अनेक विद्यार्थी वेगवेगळ्या क्षेत्रात मोलाचे कार्य करत आहेत. सातपुते सर शिक्षकी पेशा सांभाळत, साहित्य क्षेत्रात सुद्धा मोलाचे कार्य करत असतात. सातपुते सरांच्या आणि गुळवे सरांच्या कार्याला माझा मनःपूर्वक सलाम! तसेच एकनाथराव पलमटे सर हे सुद्धा एक दानशूर शिक्षक म्हणून ओळखले जातात. ते पैशापेक्षा माणसांना अधिक जपतात. आपल्या पगारातील काही रक्कम गोरगरीब, अनाथ मुले व वृद्धाश्रमात खितपत पडलेल्या वृद्धांना देऊन त्यांच्या जीवनात आनंदाचे क्षण आणतात. पलमटे सर गोरगरीब व तळागाळातील विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्य स्वखर्चाने देतात. जे विद्यार्थी दहावी बोर्ड परीक्षेत अधिक गुण घेऊन प्रथम श्रेणीत उत्तीर्ण होतात, अशा विद्यार्थ्यांना पलमटे सर पैशाच्या रूपात पारितोषिक देऊन त्यांचा सन्मान करतात. पलमटे सरांना भाषण करण्याची खूप आवड आहे. ते शाळेत महापुरुषांच्या जयंतीदिनी व पुण्यतिथी दिनी आपल्या प्रभावी भाषणातून विद्यार्थ्यांवर जबरदस्त छाप पाडतात. ते उत्तम वक्ते म्हणून सुपरिचित आहेत. ते विद्यार्थी घडावेत म्हणून खूप खूप प्रयत्न करतात. शाळेत वेळेवर येणे व वर्गात जाऊन वेळेवर शिकवणे आणि पुस्तका व्यतिरिक्त इतर ज्ञान देणे, हे काम पलमटे सर जीव ओतून व आवडीने करतात. त्यांच्या कार्याला व दायित्वाला माझा मनःपूर्वक सलाम. अशा कर्तृत्ववान शिक्षकांमुळेच विद्यार्थ्यांच्या जीवनाचे सोने होत असते. दुर्दैवाने असे कर्तृत्ववान शिक्षक शाळेला लाभणे दुरापास्त झाले आहे. गुळवे सर, सातपुते सर, पलमटे सर या तिन्ही गुणी व ज्ञानी आदर्श शिक्षकांचा आदर्श घेऊन इतर शिक्षकांनी सुद्धा विद्यार्थी घडवण्यासाठी जीवाचे रान केले पाहिजे. तरच विद्यार्थ्यांच्या जीवनाचे सोने होईल...

**-बुद्धभूषण चंद्रकांत कांबळे**
**खंडाळी ता.अहमदपूर जिल्हा लातूर**
**मो.७४९८७१५६६१**

# वर्गमित्र २० वर्षानंतर आले एकत्र आठवणींना उजाळा, २००६ बॅचच्या माजी विद्यार्थ्यांचा स्नेहमेळावा

**परतूर । प्रतिनिधी -** परतूर (वा.) पी एम.श्री.स्कूल भारतरत्न डॉक्टर बाबासाहेब आंबेडकर आदर्श शाळा जिल्हा परिषद प्रशाला परतूर, येथे २००६ च्या बॅच मधील माजी विद्यार्थ्यांचा स्नेह मेळावा दिनांक १४ डिसेंबर रोजी संपन्न झाला. यामध्ये सर्वप्रथम कार्यक्रमाची सुरुवात सकाळच्या परिपाठा नंतर दीपप्रज्वलन करण्यात आले. त्यानंतर प्रत्येक विद्यार्थ्यांनी आपला परिचय देऊन जुन्या आठवणींना उजाळा देण्याचा प्रयत्न केला. यात सर्व विद्यार्थ्यांनी आपापल्या विवाहित, व्यवहारिक जीवन, सुखी आणि समृद्धी, नोकरी, तर कोणी व्यवसाय करतात. किंबहुना सर्व समाधानी आहेत अशा प्रतिक्रिया व्यक्त केल्या. या स्नेह मेळाव्यात माजी विद्यार्थ्यांनी शालेय जीवनातील आठवणींना उजाळा देत जुन्या शिक्षकांशी मनमोकळ्या गप्पा मारल्या आणि शाळेच्या सर्वांगीण विकासासाठी एकत्रितपणे कार्य करण्याचे आश्वासन दिले.

कार्यक्रमाच्या माध्यान्ह वेळेत स्नेहभोजनाचा कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. त्याचा सर्वांनी मनमुराद स्वाद घेतला. उत्तम प्रकारे जेवणाची व्यवस्था केली. अशी कौतुकाची छाप देखील दिली. याप्रसंगी शाळेचे मुख्याध्यापक श्री. राठोड तसेच सहकारी शिक्षक वर्ग श्री. नागरे, नंद सर, डी. एन. पवार, लिंगनवाड, आठवे बरीदे, इंगळे, औंढेकर, श्रीमती मस्के आदि शिक्षक वृंद उपस्थित होते. सर्व स्नेही गुरुजणांचे शाल व श्रीफळ देऊन स्वागत करण्यात आले. किंबहुना आलेल्या सर्व माजी विद्यार्थ्यांचे देखील पुष्पगुच्छ व भेटवस्तू देऊन स्वागत करण्यात आले.

सूत्रसंचालन संदिप बिनगे यांनी केले. तर शिवाजी मुळे यांनी आभार व्यक्त केले. कार्यक्रम यशस्वीरित्या पार पाडण्यासाठी महादेव लालझरे, संदीप अवसारे सर, आयएफ एल.बँक मॅनेजर परतूर,विनोद वावरे, सोमेश्वर सोनटक्के, किरण महाजन आदींनी पुढाकार घेतला.



# रक्ताला धर्म नसतो, माणुसकी हाच सर्वोच्च कायदा; रूढी-परंपरेपेक्षा जीव महत्त्वाचा - अॅड. महेश धनावत

## सामाजिक रूढी, वैज्ञानिक दृष्टिकोन आणि भारतीय संविधानाने दिलेल्या जीवनाच्या हक्कावर कायदेशीर भूमिका

**जालना । प्रतिनिधी -** एका सकाळी घडलेली एक घटना अत्यंत विदारक असून, ती समाजाला अंतर्मुख करणारी आहे. एका महिलेला अत्यंत गंभीर अवस्थेत रुग्णालयात आणण्यात आले. तिचे रक्तदाब, रक्तातील साखर आणि ऑक्सिजनची पातळी धोकादायकरित्या खालावली होती. या जीवघेण्या परिस्थितीचे कारण होते 'उपवास'. डॉक्टरांनी तिला उपवास न करण्याचा सल्ला दिला असता, तिचे उत्तर होते, आमच्यात तसं चालत नाही, करावंच लागतं. ही अंधश्रद्धा आणि अवैज्ञानिक रूढींचे पालन करण्याची प्रवृत्ती केवळ त्या महिलेच्या जीवावर बेतली नाही, तर ती भारतीय संविधानाने प्रत्येक नागरिकाला दिलेल्या जगण्याच्या मूलभूत हक्काची पायमल्ली आहे.

या गंभीर विषयावर आपली कायदेशीर भूमिका मांडताना नोटरी असोसिएशनचे कार्याध्यक्ष, ड. महेश धनावत यांनी मानवतेच्या मूल्यावर आणि कायद्याच्या सार्वभौमत्वावर जोर दिला. ते म्हणाले, जेव्हा 'आमच्यात हे चालत नाही' असे म्हणून कुणी जीवघेण्या परंपरांचे समर्थन करते, तेव्हा ते केवळ अज्ञान नसते, तर कायद्याचे आणि मानवतेचे उल्लंघन असते. अशा घटना मला नेहमी 'रक्तपेढीचे जनक' डॉ. चार्ल्स ड्र्यू यांच्या त्यागाची आठवण करून देतात, ज्यांनी रक्ताला धर्माच्या आणि वंशाच्या पलीकडे नेऊन ठेवले.

अॅड. धनावत यांनी डॉ. ड्र्यू यांच्या जीवनातील संघर्षातून मानवतेचा सर्वोच्च संदेश दिला.

डॉ. चार्ल्स ड्र्यू: मानवतेसाठी लढलेला विज्ञानयोद्धा

अॅड. धनावत यांनी सांगितले, १९०४ साली अमेरिकेत जन्मलेल्या डॉ. चार्ल्स ड्र्यू यांनी आपले संपूर्ण आयुष्य 'रक्त' या जीवनदायी घटकाच्या संशोधनासाठी वाहून घेतले. दुसऱ्या महायुद्धाच्या काळात, जेव्हा रणांगणावर सैनिक रक्ताअभावी मृत्युमुखी पडत होते, तेव्हा डॉ. ड्र्यू यांनी रक्तातील प्लाझ्मा वेगळा करून तो अधिक काळ साठवण्याची क्रांतिकारक पद्धत शोधली. त्यांच्या या शोधामुळे 'ब्लड बँक' ही संकल्पना जन्माला आली आणि लाखो लोकांचे प्राण वाचले. यामुळेच जग त्यांना 'रक्तपेढीचा जनक' म्हणून ओळखते.

परंतु, अॅड. धनावत पुढे म्हणाले, ज्या काळात डॉ. ड्र्यू मानवतेची सेवा करत होते, त्याच काळात अमेरिका वर्णभेदाच्या विषारी मानसिकतेने ग्रस्त होती. प्रशासनाने एक अमानवी आणि विज्ञानाला काळीमा फासणारा आदेश काढला - 'रक्ताच्या बाटल्या 'श्वेत' आणि 'कृष्णवर्णीय' अशा रंगांनुसार वेगळ्या ठेवाव्यात.' हा आदेश पाहून डॉ. ड्र्यूंचा स्वाभिमान दुखावला. त्यांनी ठणकावून सांगितले, 'रक्ताला रंग नसतो, त्याला वंश नसतो, त्याला फक्त एकच ओळख असते - माणुसकी!' पण त्यांच्या या आवाजाकडे दुर्लक्ष करण्यात आले आणि त्यांनी स्वाभिमानाने आपल्या पदाचा राजीनामा दिला.

त्यांच्या जीवनाची शोकांतिका ३ एप्रिल १९५० रोजी झाली. एका भीषण कार अपघातात डॉ. ड्र्यू गंभीर जखमी झाले आणि त्यांच्या शरीरातून मोठ्या प्रमाणात रक्तस्राव झाला. त्यांना जवळच्या रुग्णालयात नेण्यात आले, पण ते कृष्णवर्णीय असल्याने त्यांच्यावर उपचार करण्यास हेतुपुरस्सर विलंब करण्यात आला. ज्या माणसाने जगाला रक्तसाठवणुकीचे तंत्रज्ञान दिले, तोच महान शास्त्रज्ञ वेळेवर रक्त न मिळाल्याने आणि वर्णद्वेषामुळे मरण पावला. त्याच्या त्वचेच्या रंगाने विज्ञानाचा आणि मानवतेचा पराभव केला.

संवैधानिक तरतुदी आणि सर्वोच्च न्यायालयाचा दृष्टिकोन

अॅड. धनावत यांनी या घटनेचा संबंध भारतीय संविधानातील जीवनदायी तत्त्वांशी आणि सर्वोच्च न्यायालयाच्या निवाड्यांशी जोडला.

१. अनुच्छेद २१ (जीवित व व्यक्तिगत स्वातंत्र्याचे संरक्षण): भारतीय संविधानाचा अनुच्छेद २१ प्रत्येक नागरिकाला सन्मानाने जगण्याचा हक्क देतो. हा केवळ श्वास घेण्याचा हक्क नाही, तर त्यात आरोग्याचा आणि वेळेवर वैद्यकीय उपचार मिळवण्याचा हक्कही समाविष्ट आहे.

या संदर्भात, पश्चिम बंगाल खेत मजदूर समिती विरुद्ध पश्चिम बंगाल सरकार, (१९९६) ४ एस एस सी ३७ या खटल्याचा उल्लेख अत्यंत महत्त्वाचा आहे.

खटल्याची पार्श्वभूमी (कथा स्वरूपात):

हा खटला हकीम शेख नावाच्या एका शेतमजुराच्या वेदनादायी अनुभवावर आधारित आहे. हकीम शेख एका चालत्या ट्रेनमधून पडून गंभीर जखमी झाले, त्यांच्या डोक्याला जबर मार लागला होता. त्यांना जवळच्या सरकारी रुग्णालयात नेले असता, तिथे खाट उपलब्ध नाही असे सांगून दाखल करून घेण्यास नकार देण्यात आला. एकापाठोपाठ एक, तब्बल सहा सरकारी रुग्णालयांनी त्यांना उपचारासाठी दाखल करून घेण्यास नकार दिला, कारण एकतर त्यांच्याकडे पुरेशा सुविधा नव्हत्या किंवा खाटा शिल्लक नव्हत्या. अखेरीस, त्यांना एका खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले, जिथे उपचारासाठी त्यांना १७,००० रुपये खर्च आला.

या अमानुष अनुभवानंतर, पश्चिम बंगाल खेत मजदूर समितीने सर्वोच्च न्यायालयात धाव घेतली. सर्वोच्च न्यायालयाने या प्रकरणात एक ऐतिहासिक निकाल दिला. न्यायालयाने स्पष्ट केले की, वेळेवर आणि पुरेसे वैद्यकीय उपचार मिळण्याचा हक्क हा अनुच्छेद २१ अंतर्गत जगण्याच्या हक्काचा अविभाज्य भाग आहे. सरकारी रुग्णालयांनी आर्थिक संसाधनांची किंवा सुविधांची कमतरता असल्याचे कारण सांगून रुग्णाला परत पाठवणे, हे त्याच्या मूलभूत हक्काचे थेट उल्लंघन आहे. राज्याचे हे घटनात्मक कर्तव्य आहे की त्यांनी प्रत्येक नागरिकाच्या जीविताचे रक्षण करावे आणि त्यासाठी पुरेशा वैद्यकीय सुविधा उपलब्ध करून द्याव्यात. २. अनुच्छेद १५ (भेदभावास मनाई): संविधानाने धर्म, वंश, जात, लिंग किंवा जन्म स्थान या कोणत्याही कारणावरून नागरिकांमध्ये भेदभाव करण्यास सक्त मनाई केली आहे. डॉ. ड्र्यू यांचा मृत्यू ज्या वर्णद्वेषामुळे झाला, तोच भेदभाव भारतीय कायद्यानुसार गंभीर गुन्हा आहे.

३. अनुच्छेद ५१क(ह) (वैज्ञानिक दृष्टिकोन आणि मानवतावाद): संविधानाने प्रत्येक नागरिकावर वैज्ञानिक दृष्टिकोन, मानवतावाद आणि सुधारणावाद यांचा विकास करण्याची जबाबदारी टाकली आहे. आरोग्यासाठी धोकादायक असलेल्या रूढी-परंपरांचे पालन करणे, हे या घटनात्मक कर्तव्याच्या विरुद्ध आहे. शेवटी, अॅड. धनावत यांनी समाजाला आवाहन केले की, डॉ. चार्ल्स ड्र्यू यांचे जीवन आणि हकीम शेख यांचा संघर्ष आपल्याला एकच शिकवण देतो - माणसाने माणसाला वाचवणे, हाच सर्वात मोठा धर्म आणि कायदा आहे. ज्याप्रमाणे रक्त देताना आपण जात किंवा धर्म विचारत नाही, त्याचप्रमाणे जीवघेण्या रूढींना नाकारून आपण विज्ञानाचा आणि मानवतेचा मार्ग स्वीकारला पाहिजे. कारण रक्त फक्त लाल असते आणि त्याचा धर्म केवळ माणुसकी असतो.




## मनपा निवडणुकीत खुल्या प्रवर्गातील जागेवर खुल्या प्रवर्गातील उमेदवारांनाच संधी द्या

### मराठा महासंघाची पक्षाकडे मागणी




**जालना । प्रतिनिधी** - आज दिनांक १७ बुधवार रोजी सकाळी दहा वाजता मिळालेल्या माहितीनुसार जालना महानगरपालिका निवडणुकीत खुल्या प्रवर्गातील जागेवर खुल्या प्रवर्गातील उम ेदवारांनाच संधी द्यावी अशी मागणी मराठा महासंघाच्या वतीने जालन्यातील प्रत्येक पक्षाच्या प्रमुखांकडे करण्यात आली आहे.लेखी निवेदन देऊन ही मागणी करण्यात आली आहे. खुल्या प्रवर्गातील उमेदवारांना प्रत्येक जागेसाठी सर्व प्रवर्गांशी स्पर्धा करावी लागते. त्याच जागेवर इतर प्रवर्गातील उमेदवार देखील उभा राहू शकतो. यामुळे खुल्या उमेदवारांचा अधिकार प्रत्यक्षात कमी होतो.यामुळे खुल्या प्रवर्गातील जागांसाठी खुल्या उमेदवारांनाच संधी द्या, अशी मागणी मराठा महासंघाचे राष्ट्रीय विभागीय चिटणीस अरविंद देशमुख यांनी सर्व पक्षांच्या जिल्हाध्यक्षांसह प्रमुखांकडे केली.दरम्यान या मागणीची अंमलबजावणी न झाल्यास मराठा महासंघाच्या विचारसरणीचा उमेदवार देऊन त्याला निवडून आणू, असा ईशारा देशमुख यांनी दिला आहे.

### बंजारा समाज आरक्षणाचा विषय आ. अर्जुनराव खोतकर यांनी हिवाळी अधिवेशनामध्ये मांडला

## सिंदखेडराजा आरक्षण समितीच्या वतीने आ.अर्जुन खोतकर यांचा सत्कार

**जालना । प्रतिनिधी** - सिंदखेडराजा परिसरातील गोर बंजारा आरक्षण समिती च्या वतीने आ.अर्जुन खोतकर यांनी हिवाळी अधिवेशन नागपूर येथे विधिमंडळ सभागृहामध्ये महाराष्ट्रातील बंजारा समाजाला एसटी प्रवर्गामध्ये आरक्षण मिळावे या संदर्भात सरकारला मागणी केली.याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला.यावेळी डॉ.विजय राठोड, रोहिदास राठोड नशिराबाद, दत्तू भाऊ चव्हाण सर गारखेड तांडा, जगन चव्हाण वसंत नगर तांडा ,संदीप उर्फ छोटू, बबन शेळके धांदरवाडी, बंडू पवार दत्तापूर, अरविंद पवार दत्तापूर, अमोल राठोड दत्तापूर तांडा, पंजाब पवार दत्तापूर,गजानन पवार वसंत नगर, जालना परिसरातील बंजारा बांधव व सिंदखेड राजा येथील सम ाजीक चळवळीतील कार्यकर्ते यांनी आ.अर्जुन खोतकर यांनी हिवाळी अधिवेशन बंजारा आरक्षण बाबतीत चर्चा केली व आरक्षण मिळवून देण्याचे बंजारा समाजासाठी सर्वात मोठे कार्य करत असून,आज अर्जुन भाऊ खोतकर व इतर आमदार,मंत्री,मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस नागपूर या ठिकाणी हिवाळी अधिवेशन मध्ये चर्चा करून बंजारा समाजांना न्याय देण्याचा कार्य करीत आहे. म्हणून सिंदखेडराजा तालुका परिसरातील बंजारा समाज जालना येथे आ.अर्जुन खोतकर यांना शाल पुष्पगुच्छ देऊन स्वागत केले.या वेळी समाज बांधवांनी सांगितले की, बंजारा समाजाला आ.अर्जुन खोतकर यांच्या माध्यमातून नक्की न्याय मिळवून देतील अशी अपेक्षा ठेवून आज रोजी इच्छा व्यक्त केली.



## पार्थ सैनिकी शाळेचे २२ वे वार्षिक स्नेह संमेलन १९ डिसेंबरला

**जालना । प्रतिनिधी** - जालना जिल्ह्यातील एकमेव प्रतिष्ठित पार्थ सैनिकी शाळा व कनिष्ठ महाविद्यालय खरपुडीचे २२ वे वार्षिक स्नेह संमेलन शुक्रवारी (दि. १९) सकाळी ९.३० वाजता संपन्न होत आहे. या स्नेह संमेलनास प्रमुख पाहुणे म्हणून जिल्हा परिषद, जालनाच्या मुख्य कार्यकारी अधिकारी श्रीमती मिन्नू पी. एम. या उपस्थित राहणार आहेत तर कार्यक्रम ाच्या अध्यक्षस्थानी माजी आरोग्यमंत्री तथा मत्स्योदरी शिक्षण संस्थेचे अध्यक्ष राजेशभैय्या टोपे यांची उपस्थिती राहणार आहे.

या स्नेह संमेलनानिमित्त शिवजागरचे मुख्य प्रवर्तक झी टॉकीज प्रसिध्द राष्ट्रीय शिवकिर्तनकार प्रा.डॉ. गजानन महाराज वाव्हळ यांचे प्रबोधनात्मक विचार उपस्थिताना ऐकण्यास मिळतील. या स्नेह संमेलनास सन्माननीय उपस्थिती म्हणून म त्स्योदरी शिक्षण संस्थेच्या सचिव सौ. मनिषाताई टोपे व संस्थेचे प्रशासकीय अधिकारी डॉ. बी. आर. गायकवाड यांची प्रमुख उपस्थिती लाभणार आहे, अशी माहिती पार्थ सैनिकी शाळेचे प्राचार्य राहुल भालेकर यांनी दिली.

या वार्षिक स्नेह संमेलनाच्या निमित्ताने प्रमुख पाहुण्यांना मानवंदना दिल्यानंतर कॅडेट परेड, मल्लखांबाची चित्तथरारक प्रात्याक्षिके, कराटे प्रात्याक्षिके व सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन केले आहे. स्नेह संमेलनासाठी शाळेच्या सर्व पालकांना आमंत्रित केले असून, कार्यक्रमानंतर स्नेह भोजनाचे आयोजन केले आहे.

कार्यक्रमास सर्व पालक, माजी विद्यार्थी व निमंत्रितांची शुक्रवारी डिसेंबर रोजी सकाळी ९.३० वाजता सैनिकी शाळेच्या प्रांगणात मोठ्या संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन प्रशासक मोहन नेहेरे व प्राचार्य राहुल भालेराव यांनी केले आहे.

## लाला सुट अन् पानटपऱ्यावर कारवाईचा धडाका

जालना - जालना जिल्ह्यामध्ये जिल्हाधिकारी अशिमा मित्तल, पोलिस अधिक्षक अजयकुमार बन्सल, जिल्हा शल्य चिकित्सक डॉ. राजेंद्र पाटील, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरिक्षक पंकज जाधव, सहा. पोलीस उपनिरिक्षक योगेश उबाळे तसेच अतिरिक्त जिल्हा शल्यचिकित्सक डॉ. राजेंद्र गाडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली शहरातील मंठा रोड येथे अवैधरित्या गुटखा, तंबाखु, मावा, जर्दा, खर्रा आणि सुट्टे सिगारेट इत्यादींची विक्री करणाऱ्या तसेच तंबाखु नियंत्रण कायद्याचे उल्लंघन करणाऱ्या व्यक्ती व पानटपरीधारकांवर कोटपा- २००३ कायदा अंतर्गत जिल्हा तंबाखु नियंत्रण अंमलबजावणी पथकाद्वारे छापे टाकण्यात आले. मुळात अवैध गुटखा विक्रीचा जिल्ह्यातील बादशाह सतिश जैस्वाल उर्फ लाला यांच्या गुटखा विक्रीवर निर्बंध लावण्यात पोलीस प्रशासनाला अपशय आल्याचे दिसून येत आहे. पोलीस प्रशासनाला माहिती देऊनही जर लाला सारख्यांच्या अवैध गुटख्यावर कारवाई होत नसेल तर अशा छोट्या-छोट्या पानटपऱ्यांवर सर्रास गुटखा विक्री होणार हे तितकेच सत्य आहे. जर अवैध गुटखा विक्रीच्या मुळावर घाव घातला तर अशा छोट्या -छोट्या कारवाया दाखवून राज्य शासनाच्या आदेश-पत्राला उत्तर देण्यासाठी कारवाईचा बडगा उचलण्याची आवश्यकता राहणार नाही.

समिश्र अधिकाऱ्यांच्या कारवाईमध्ये कायद्याअंतर्गत विविध कलमानुसार एकुण ११ पानटप-यांवर कारवाई करुन ४ हजार ९०० रुपयांचा दंड वसुल करण्यात आला. ही कारवाई संपुर्ण जिल्हाभरात यापुढेही जिल्हाधिकारी व पोलीस अधिक्षक यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात येणार आहे. तरी पानटपरी धारकांनी अवैधरित्या कुठल्याही तंबाखु व तंबाखुजन्य पदार्थाची विक्री करु नये. असे आवाहन करण्यात आले आहे. ही कार्यवाही स्थानिक गुन्हे शाखेचे एस.पी. तनपुरे, कैलास खार्डे, राष्ट्रीय तंबाखु नियंत्रण कार्यक्रमांतर्गत जिल्हा सल्लागार डॉ. संदिप गोरे, समुपदेशक सोनाजी भुतेकर, सामाजिक कार्यकर्त्या सुनंदा कोरडे व ग्रामीण विकास संस्थेचे विभागीय व्यवस्थापक मंगेश गायकवाड यांच्याद्वारे करण्यात आली.

### २०२४-२५ वर्षाची खरीप पिकांची अंतिम पैसेवारी जाहीर

## जिल्ह्यातील ९६५ गावांची पैसेवारी ५० पैशापेक्षा कमी - जिल्हाधिकारी मित्तल

**जालना । प्रतिनिधी** - सन २०२४-२५ या वर्षाच्या खरीप हंगामात खरीप गावांची तसेच ज्या रब्बी गावांत दोन तृतीयांश पेक्षा जास्त खरीपात पेरणी केलेली आढळली आहे, त्या गावांची अंतिम पैसेवारी देखील खरीप हंगामात जाहीर करण्यात करण्यात आली आहे. त्यानुसार जालना जिल्ह्याच्या आठ तालुक्यातील खरीप पिकांच्या पैसेवारीमध्ये खरीप गावे एकूण ६६७ व रब्बी गावे २९८ अशा एकूण ९६५ गावांची खरीप अंतिम पैसेवारी जाहीर केली आहे. यामध्ये जिल्ह्यातील ९६५ गावांची पैसेवारी ५० पैशापेक्षा कमी आली आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी दिली आहे.



जिल्ह्यातील ९७१ गावांपैकी ६६७ खरीप गावे व २९८ रब्बी गावे असे एकुण ९६५ गावांची सुधारित पैसेवारी जाहीर करण्यात आली आहे. तर परतूर तालुक्यातील राणी वाहेगाव हे गाव पूर्णतः निम्न दुधना प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्राम ध्ये गेल्यामुळे त्या गावाची पैसेवारी जाहीर करण्यात आलेली नाही. तसेच मंठा तालुक्यातील चांदेश्वर व गोपेगाव हे गाव पुर्णतः निम्न दुधना प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्रामध्ये गेल्यामुळे तसेच गारटेकी, सोनुनकरवाडी व किर्तापूर तांडा या गावांना महसूल दर्जा प्राप्त नसल्यामुळे मंठा तालुक्यातील ५ गावांची पैसेवारी जाहीर करण्यात आली नाही. जालना जिल्ह्यातील पैसेवारी जाहीर केलेल्या एकुण ९६५ गावांची पैसेवारी ५० पैशापेक्षा कमी आली आहे. खरीप पिकांची हंगामी पैसेवारी असलेल्या गावांची संख्या तालुकानिहाय पुढीलप्रमाणे आहे. जालना तालुका - १५१ गावे, बदनापूर-९२, भोकरदन-१५६, जाफ्राबाद-१०१, परतूर-९८, मंठा-११७, अंबड-१३८, घनसावंगी-११८ आदि गावांचा समावेश आहे.

## शिक्षिका सौ.शैला देशमुख अर्धापूरकर शिक्षकरत्न पुरस्काराने सन्मानित

**अर्धापूर । प्रतिनिधी** - आखाडा बाळापूर येथे जिल्हा परिषद शाळेवर कार्यरत शिक्षिका असलेल्या सौ.शैला पंडितराव खोत देशमुख अर्धापूरकर यांना काव्य स्पंदन साहित्य समूह सृजन सन्मान पुरस्कार २०२५ अंतर्गत शिक्षकरत्न पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले आहे.

ता.१४ रोजी आखाडा बाळापूर येथील इच्छापूर्ती मंगल कार्यालय येथे सृजन सन्मान पुरस्कार सोहळ्याचे आयोजन करण्यात आले होते.या कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून तडफदार आमदार संतोषजी बांगर हे होते तर संमेलनाध्य क्ष श्री.विश्वनाथ सूर्यवंशी हे होते.सौ. देशमुख यांनी आपल्या ३३ वर्षाच्या शिक्षकीच्या कार्यकाळात अनेक उत्तम विद्यार्थी घडविले असून आज त्यातील अनेक जण उच्च पदस्थ अधिकारी म्हणून देश सेवा करीत आहेत.त्यांच्या या कार्याचा गौरव म्हणून २०२५ चा शिक्षकरत्न पुरस्कार त्यांना देऊन गौरविण्यात आले.याप्रसंगी काव्य स्पंदन साहित्य समूहाच्या अध्यक्षा सौ. रंजना कराडे,उपाध्यक्ष सौ.संगीता माने,कोषाध्यक्ष श्री.भालचंद्र कराडे, कार्यवाहक क्रांती राणे पाटील,सचिव डॉ.श्री.रविंद्र वेदपाठक,सहकार्य श्री. मनोहर वाळिंबे,संचालक श्री.अजित माने,श्री.अजय रामटेके,श्री नितीन रसाळ हे उपस्थित होते.सन्मानचिन्ह, प्रशस्तीपत्र,फेटा बांधून,शाल व श्रीफळ देऊन शिक्षकरत्न हा पुरस्कार देण्यात आला.सौ.शैला पंडितराव खोत देशमुख अर्धापूरकर यांना शिक्षकरत्न पुरस्कार मिळाल्याबद्दल त्यांचे सर्व स्तरातून अभिनंदन करण्यात येत असून त्यामध्ये श्री.आर आर.देशमुख,श्री.मधुकरराव देशमुख श्री.कृष्णाजी देशमुख,श्री.सुधाकरराव देशमुख,महाराष्ट्र राज्य मराठी पत्रकार संघ अर्धापूरचे तालुकाध्यक्ष अध्यक्ष उध्दवराव सरोदे,प्रा.तानाजी मेटकर, प्रशांत खैरनार,राजेंद्र साबळे साहेबराव लोखंडे,डॉ.संभाजी शेटे, व्यंकटी माटे व ईतर मान्यवरांनी त्यांचे अभिनंदन करून त्यांना पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या.




हे पत्र मालक, मुद्रक, प्रकाशक दीपक श्रीकृष्ण शेळके यांनी जगदंबा प्रिंटर्स, डबल जीन, जुना जालना ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक **युवा आदर्श**, शीतल किराणा जवळ, गांधीनगर, रोहणवाडी रोड, जालना. ता. जि. जालना ४३१२०३ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. **संपादक : दीपक श्रीकृष्ण शेळके मो.नं. ८३९००९८८८६, ८३९००४८८८६,** E-mail : yuva.aadarsh@gmail.com. RNI No. MAHMAR/2019/78282 Printer, Publisher and Owner Deepak Shrikrushna Shelke Printed At Jagdamba Printers, Plot no. 12 Dabal Jin, JALNA. Tq. Dist. JALNA 431203 (Maharashtra) Place of Publication Office Daily Yuva Aadarsh, Near Shital Kirana, Gandhinagar, Rohanwadi Road, JALNA, Dist JALNA 431203 (Maharashtra) Editor : Deepak Shrikrushna Shelke Mob no. 8390098886, 8390048886 E-mail : yuva.aadarsh@gmail.com RNI No. MAHMAR/2019/78282. अंकात प्रकाशित होणाऱ्या लेखाशी संपादक मंडळ सहमत असेलच असे नाही. लेखातील मजकुरासंदर्भातील सर्वस्वी जबाबदारी ही संबंधीत लेखकाचीच असेल.